CIDCO WE MAKE CITIES
प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
सिडको शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

दि. 24.11.2020

# सिडको उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांनी घेतला उलवे नोडमधील महत्वाचे प्रकल्प व विकासकामांचा आढावा

सिडकोतर्फे नवी मुंबईतील उलवे नोडमध्ये सुरू असलेल्या अनेक विकासकामांचा तसेच सदर नोडमध्ये साकारल्या जात असणाऱ्या सिडकोच्या महत्वाच्या प्रकल्पांचा **सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी** यांनी दिनांक २३ नोव्हेंबर २०२० रोजी आढावा घेतला. या प्रसंगी त्यांनी उलवे नोडमधील भूमीपुत्र भवन, एमटीएचल प्रकल्प, नागरी सेवा-सुविधा व त्याचप्रमाणे पुनर्वसन व पुनःस्थापना योजनेंतर्गत सिडकोतर्फे विकसित केला जात असलेल्या पुष्पक नोडचीदेखील पाहणी केली.

या प्रसंगी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांसमवेत **श्री. के. एम. गोडबोले, मुख्य अभियंता (नवी मुंबई), श्री. राजेंद्र धायटकर, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ)** व सिडकोचे प्रकल्पाशी संबंधित अधिकारी देखील उपस्थित होते.

सिडको अधिकारक्षेत्रातील उलवे नोडचा झपाट्याने विकास होत आहे. अनेक मोठे व महत्वाकांक्षी प्रकल्प या नोडमध्ये साकारले जात आहेत. याचबरोबर नोडमधील नागरिकांना सर्वोत्तम दर्जाच्या नागरी सेवा-सुविधा प्राप्त व्हाव्यात यासाठी सिडको कटीबद्ध आहे. याच अनुषंगाने आज उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांनी उलवे नोडमधील रस्ते, फुटपाथ, इ. नागरी सुविधांचा आढावा घेतला व संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शनपर सूचनादेखील दिल्या.

त्याचबरोबर उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी महत्वाकांक्षी अशा एमटीएचएल म्हणजेच मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्पाच्या साईटला देखील भेट दिली. एमटीएचएलचे नवी मुंबईस जोडणारे टोक व त्याचप्रमाणे एकूणच या प्रकल्पाची कनेक्टिव्हीटी या सर्व बाबींचा त्यांनी आढावा घेतला. हा प्रकल्प भविष्यात सिडकोतर्फे खारकोपर रेल्वे स्थानकाजवळ साकारण्यात येत असलेली गृहनिर्माण योजना व लॉजिस्टिक पार्क यांच्यापासून अगदीच जवळ आहे. त्यामुळे सिडकोचे परिवहन केंद्रीत विकासाचे उद्दीष्टदेखील एमटीएचएलच्या माध्यमातून पूर्ण होणार आहे. या प्रकल्पाची पाहणी करून उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी प्रकल्पाशी संबंधित अधिकाऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन केले.

याचबरोबर उलवे नोडमध्ये नवी मुंबईच्या सर्व प्रकल्पबाधितांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याचे प्रतिक म्हणून सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेल्या भूमिपुत्र भवनाचीदेखील त्यांनी पाहणी केली. नवी मुंबईकरांना त्यांचे सण-समारंभ थाटामाटात साजरे करता यावेत यासाठी बामणडोंगरी रेल्वे स्थानकाच्या अगदी जवळच हे भूमिपुत्र भवन साकारण्यात येत आहे. सिडकोने नेहमीच प्रकल्पबाधितांच्या सहकार्याचा व त्यांच्या सर्व प्रकारच्या गरजांचा विचार करून त्यांच्या कल्याणावर भर दिला आहे. लवकरच हे भूमिपुत्र भवन नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातील सर्व नागरिकांच्या सेवेसाठी तयार असणार आहे.

उलने नोडला लागूनच सिडकोतर्फे नवी मुंबई आंतरराष्ट्री विमानतळ प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करण्यासाठी पुष्पक नोडचा विकास करण्यात येत आहे. या नोडमध्ये प्रकल्पबाधितांना सिडकोतर्फे विकसित भूखंड दिलेले असून त्यावर बहुतांशी प्रकल्पबाधितांनी बांधकाम सुरू देखील केले आहे. याचादेखील उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांनी आढावा घेतला.

एकूणच उलवे नोडचा विकास आणखीन झपाट्याने, सर्वांगाने व परिपूर्ण व्हावा यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना व कार्ये वेगाने व तत्परतेने करण्याचे मार्गदर्शन उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**